# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- दिनांक.०७.०४.२०२०

वाचाः- या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २५.०३.२०२०.

विषयः- अत्यावश्यक सेवा अंतर्गत येणा-या बाबींची दुरुस्ती बाबत.

<u>आदेश</u>

त्याअनुषंगाने मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भीय आदेशान्वये नांदेड जिल्हयात दिनांक ३१ मार्च २०२० रोजी पासून ते दि.१४.०४.२०२० चे २४.०० वा. पर्यंत जमावबंदी आदेश लागू करीत असून या कालावधीत (५) पाच व त्या पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास प्रतिबंध निर्गमित करण्यात आले आहे, त्यामध्ये जीवनावश्यक वस्तू / अत्यावश्यक सेवा प्रतिबंधामधून वगळण्यात आले आहे. सद्यस्थितीतीतील आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता खालील कामे होणे गरजेचे आहे, जेणेकरुन अत्यावश्यक सेवा कोलमडणार नाही. मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन मी **डॉ. विपीन इटणकर, जिल्हाधिकारी नांदेड तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड** या अन्वये अत्यावश्यक स्वरुपाची कामे पूर्ण करण्यासाठी निर्देश देत आहे. सदरची कामे खालील नमुद केल्याप्रमाणे आहेत.

१) जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य व प्रमुख महामार्गाची कामे आणि दुरुस्ती करणे व पावसाळया पूर्वीची दुरुस्तीची कामे.

२) जिल्हयातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे कार्यक्षेत्रातील अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण कामकाज, सांडपाणी व्यवस्था व पावसाळयापूर्वीची सर्व दुरुस्तीची कामे.

३) ग्रामीण रस्ते तसेच पंतप्रधान सडक योजने अंतर्गत रस्ते दुरस्ती.

४) महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि इतर विद्युत विषयक विभागाकडील इलेक्ट्रीक पोल टाकणे व इलेक्ट्रीक मेंटनन्स, दुरस्ती इ.

५) भारत संचार निगम लिमिटेड आणि इतर दुरसंचार कंपनी कडील दूरसंचार आणि इंटरनेट सेवा संचालन, लाईन मेंटनन्स इ. खाजगी क्षेत्रातील संस्थांना MTNL आणि BSNL चे जिल्हास्तरावरील अधिकारी यांनी लेखी आदेश द्यावेत.

Scanned with CamScanner

६)	पाणी पुरवठा आणि जलनिस्सारण आणि स्वच्छता इत्यादी अनुषंगिक कामे.

तसेच संबंधित विभागाचे जिल्हा प्रमुख अधिकारी यांना असेही निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी उपरोक्त नमुद अत्यावश्यक सेवेसाठी नमुद अधिकारी, कर्मचारी आणि वाहने याकामी नेमणूक करुन त्याप्रमाणे आदेश आपले स्तरावर काढण्यात यावेत. सदर आदेशाची प्रत पोलीस विभागाकडे द्यावी आणि सर्व नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना कामावर ये-जा करताना आदेशाची प्रत आणि कार्यालयाचे ओळखपत्र सोबत बाळगण्याच्या सूचना द्याव्यात.

तसेच उपरोक्त विभाग / संस्था यांनी कोविड १९ या विषाणू संसर्गाविषयी आवश्यक ती काळजी घ्यावी. तसेच SOCIAL DISTANCING चे निर्देश पाळावेत आणि आरोग्य विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

प्रस्तुत आदेशाचा भंग करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथरोग प्रतिबंधत कायद्या तसेच भारतीय दंड संहिता कलम १८८ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

सदरचे आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
५) अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, नांदेड / उर्ध्व पैनगंगा प्रकल्प, नांदेड
६) अधीक्षक अभियंता, म.रा.वि.म.कंपनी नांदेड
७) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग नांदेड / सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
८) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नांदेड
९) वरीष्ठ महाप्रबंधक, एम.टी.एन.एल. / बी.एस.एन.एल नांदेड
१०) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. नांदेड
११) कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, म.न.पा. नांदेड
१२) कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जि.प. नांदेड
१३) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१४) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१५) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपंचायत, जि.नांदेड
१६) सर्व संबंधीत विभाग प्रमुख नांदेड जिल्हा

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

जिल्हादंडाधिकारी, नांदेड

Scanned with CamScanner